20रु. बीस रुपये COURT FEE भारत INDIA TWENTY RUPEES

The copy was applied for on 05/02/22
The requisite fees for copies paid on 11/05/22
The copy was Prepared on 11/05/22
31-1-2022 The copy was endorsed & ready to deliver
on 11/05/22

J-1

# माननिय कोर्ट विद्यमान सहाय्यक धर्मादाय आयुक्त

# साहेब चंद्रपुर

अर्ज नोंदणी केल्याची तारीख 4-2-22
अर्ज नोंदणी क्रमांक 5/22
अर्जाचा प्रकार योजना
कोणत्या कलमा अंतर्गत 50A
नोंद घेणाऱ्या कर्मचाऱ्याची सही व तारीख
निशानी क्रमांक 1
स.धा.आ.

Assistant Charity Commissioner Chandrapur

Assistant Charity Commissioner Registration Branch Chandrapur Region Chandrapur

संस्थेचे नाव :- "महाराष्ट्र शिक्षण प्रसारक मंडळ चंद्रपूर, ता. जि. चंद्रपुर"

रजि नं :- एफ - ४७९३ (चं)

संस्थेचा पत्ता :- श्री. पांडुरंग सोमाजी आंबटकर
पठाणपुरा पोस्ट ऑफिस जवळ,
हिवरपुरी वार्ड नं ४८, चंद्रपुर

## महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० कलम ५० अ (१) प्रमाणे योजना मंजूरीसाठी अर्ज

अर्जदार :- १) श्री. पांडुरंग सोमाजी आंबटकर
वय ६१ वर्षे, व्यवसाय - धंदा,
पठाणपुरा वार्ड नं १, चंद्रपुर ता. जि. चंद्रपुर
२) कु. अंकिता किशोर ढोबळे
वय २९ वर्षे, व्यवसाय - शिक्षण,
आभा बिल्डिंग, लकडगंज, नागपुर

संस्थेची मालमत्ता :- -------------- परिशिष्ट १ प्रमाणे (निरंक) ------------------
काही नाही

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
चंद्रपूर विभाग, चंद्रपूर
आवक क्रमांक 827
दि. 31.01.2022

Application be registered
as 50A M.P.T Act 1950
Subject to Compliance
04-02-2022
A.C.C.

## योजना अर्ज सादर करण्याचे कारण

अर्जदार येणे प्रमाणे आहे की, सदरचे संस्था महाराष्ट्र मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये सन १९९५ साली नोंदणी झालेली आहे. सध्या परिस्थितीत परिशिष्ट - १ नुसार मंजूर कार्यकारिणी खालील प्रमाणे :-

१) श्री. पांडुरंग सोमाजी आंबटकर
२) सौ. प्रिती पांडुरंग आंबटकर
३) सौ. लिलाताई गोविंदराव लोखंडे
४) सौ. वंदना विनोदराव वरघणे
५) सौ. सुरेखा विजयराव हिवसे
६) सौ. शोभाताई वसंतराव येळणे
७) श्रीमती. सुरेखा अशोकराव कुमरवार

सध्या परिस्थितीत परिशिष्ठ - १ वर असलेल्या ०७ कार्यकारिणी सदस्यांपैकी ०२ सदस्य नामे १) सौ. लिलाताई गोविंदराव लोखंडे यांचा दिनांक ३०/०७/२०१३ रोजी २) सौ. शोभाताई वसंतराव येळणे यांचा दिनांक १४/०४/२०१७ रोजी मृत्यू झालेला आहे. व श्रीमती. सुरेखा अशोकराव कुमरवार स्थलांतरित आहेत व त्यांचा पत्ता व कोणत्याही प्रकारची संपर्क संस्थेशी नाही. आज घडीला संस्थेचे अधिकृत हयात सदस्य म्हणून ०४ (चार) सदस्य आहेत.

तसेच संस्थेच्यावतीने वर्षभर बरीच शैक्षणिक, आध्यात्मिक, धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांची अमलबजावणी संस्थेव्दारा करण्यात येते. संस्थेचे कार्य बघता संस्थेच्या कार्यामुळे गावकोषात तसेच इतरत्र परिसरातील बरीच हितचिंतक मंडळी संस्थेच्या कार्याशी जुळलेले आहे. व संस्थेच्या कार्यामुळे, ते सर्व संस्थेत कार्य करण्यास इच्छुक आहेत. परंतु सध्या असलेल्या सदस्यांव्यतिरिक्त इतर नवीन सदस्य न बनविल्याने संस्थेचे व्यवस्थापकीय, शासकीय, प्रशासकीय कामकाज सुरळीत करून संस्थेचे व्यवस्थापन सुव्यवस्थित करणे अत्यंत आवश्यक आहे.

तसेच संस्थेची घटना हीं जुन्या पद्धतीची असून संस्थेच्या नियम व नियमावलीमध्ये बऱ्याच नियमांना मर्यादा प्राप्त होतात. तसेच संस्थेचे उद्देश हे जुने असून आज परिस्थितीनुसार नवीन उद्देशांचा समावेश करणे अत्यावश्यक आहे.

संस्थेची आज स्थितीला परिस्थिती पाहता संस्थेला महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० अन्वये कलम ५० अ अन्वये नवीन योजना लागू करून संस्थेचे कामकाज सुरळीत करणे संस्थेचे हितार्थ होईल. संस्थेमध्ये आज घडीला ०४ सदस्य हयात असल्याने सदरच्या योजनेतील प्रथम विश्वस्त मंडळास मान्यता प्राप्त होणे संस्थेच्या हिताच्या दृष्टीने व संस्थेच्या उन्नतीकरिता अत्यंत आवश्यक आहे.

प्रार्थना :-

मा. विद्यमान न्यायालयास प्रार्थना करण्यात येते की, "महाराष्ट्र शिक्षण प्रसारक मंडळ चंद्रपुर, ता. जि. चंद्रपुर" नोंदणी क्रमांक : एफ - ४७९३ (चं.) या संस्थेचे यापुढील कामकाज योग्य व वैधरीतीने चालविण्यासाठी व संस्थेचे उन्नतीकरिता या सोबत दिलेल्या प्रस्तावित योजनेस (जोडपत्र अ) मंजूरी प्रदान करण्यात यावी, हि विनंती.

| अर्जदार | स्वाक्षरी |
|---|---|
| १) श्री. पांडुरंग सोमाजी आंबटकर | Ambatkar |
| २) कु. अंकिता किशोर ढोबळे | |

दिनांक :- २८|09|2022

ठिकाण :- चंद्रपूर

## -: पडताळा :-

आम्ही नामे अर्जदार क्र. १. श्री. पांडुरंग सोमाजी आंबटकर व क्र. २. कु. अंकिता किशोर ढोबळे, हे सत्यापन लिहून देत आहोत की, वरील अर्जातील मजकूर बरोबर असून ते माझ्या सांगण्यावरून लिहिण्यात आलेला आहे. तो मजकूर खरा असून तो आम्हाला मान्य आहे. म्हणून आज दिनांक २८/०७/२०२२ मुक्कामी चंद्रपुर येथे हा सत्यापन लिहून देत आहे.

करिता हे सत्यापन करीत आहो.

दिनांक :- २८/०७/२०२२

ठिकाण :- चंद्रपूर

| अर्जदार | स्वाक्षरी |
|---|---|
| १) श्री. पांडुरंग सोमाजी आंबटकर | [signature] |
| २) कु. अंकिता किशोर ढोबळे | [signature] |

Assistant Charity Commissioner ★ Chandrapur ★

Typed by
Read by
Compaird by

CERTIFIED TO BE TRUE COPY

11-8-22

Superintendent
Public Trust Registration Office
Chandrapur Region Chandrapur

१ योजना अर्ज कमांक ०५/२०२२
महाराष्ट्र शिक्षण प्रसारक मंडळ, चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर
रजी.कं.ऐ-४७९३/चं.

The copy was applied for on... 05.05.22
Required fees for copies paid on 10.05.22
The copy was Prepared on... 11.05.22
The copy was endorsed & ready to deliver on... 11.05.22

दाखल तारीख : ३१/०१/२०२२
नोंदविल्याची तारीख : ०४/०२/२०२२
निकाल तारीख : ०४/०५/२०२२
कालावधी :००- ०३ -०४
वर्ष- म. -दि.

Superintendent
Public Trust Registration Office
Chandrapur Region Chandrapur

Assistant Charity Commissioner * Chandrapur *

**सहायक धर्मादाय आयुक्त, चंद्रपूर यांचे न्यायालयात**
**( श्रीमती सि. एम. ढबाले यांचेसमोर )**

**योजना अर्ज क्र. ०५/२०२२** **निशानी क.: १०**

महाराष्ट्र शिक्षण प्रसारक मंडळ,
चंद्रपूर ता.जि. चंद्रपूर
व्दारा,

१. श्री. पांडुरंग सोमाजी आंबटकर
वय ६१ वर्षे, व्यवसाय - धंदा
पठाणपुरा वार्ड क. १, चंद्रपूर ता.जि. चंद्रपूर
२. कु. अंकिता किशोर ढोबळे
वय २९ वर्षे, व्यवसाय - शिक्षण
आभा बिल्डींग, लकडगंज, नागपूर

.......अर्जदार

**विरुध्द**

निरंक ........गैरअर्जदार

**महाराष्ट्र सार्वजनीक न्यास अधिनीयम १९५० चे कलम ५० अ अन्वये योजना अर्ज**

## न्यायनिर्णय

**( घोषीत दिनांक ०४/०५/२०२२ )**

१. अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज सदर न्यासास नविन योजना प्रदान करण्याकरिता महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनीयम, १९५० चे कलम ५०अ(१) अन्वये दाखल केलेला आहे.

CHARITY ORGANISATION

२. अर्जदाराने त्याच्या अर्जा मध्ये असे नमुद केलेले आहे की, सदर न्यास हि मुंबई सार्वजनिक विश्वस्थ व्यवस्था अधिनीयम १९५० अन्वये नोंदणी झाले आहे. परिशिष्ट-१ वर असलेल्या ७ कार्यकारिणी सदस्यांपैकी २ सदस्य नामे सौ. लिलाताई गोविंदराव लोखंडे यांचा दि. ३०/०७/२०१३ रोजी व सौ. शोभाताई वसंतराव येळणे यांचा दि. १४/०४/२०१७ रोजी मृत्यू झालेला आहे व श्रीमती सुरेखा अशोकराव कुमरवार स्थलांतरित आहे व त्यांचा पत्ता कोणत्याही प्रकारचे संपर्क संस्थेशी नाहीत. आजघडीला संस्थेचे अधिकृत हयात सदस्य ४ आहेत. तसेच संस्थेच्या वतीने वर्षभर बरीच शैक्षणिक, अध्यात्मिक, धार्मीक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यकमाची अंमलबजावणी करण्यात येते. संस्थेचे कार्य बघता गावकोशात तसेच इतरत्र परिसरातील बरीच हितचिंतक मंडळी संस्थेच्या कार्याशी जुळलेली आहेत. संस्थेच्या कार्यामध्ये संस्थेत कार्य करण्यास बरेच नवीन सदस्य इच्छुक आहेत. परंतु, सध्या नवीन सदस्य न बनविल्याने संस्थेचे व्यवस्थापकीय, शासकीय, प्रशासकीय कामकाज सुरळीत करून संस्थेचे व्यवस्थापन सुव्यवस्थित करणे आवश्यक आहे. तसेच संस्थेची घटना ही जुन्या पध्दतीची असून, संस्थेच्या नियम व नियमावलीमध्ये ब-याच नियमांना मर्यादा प्राप्त होत आहेत. संस्थेचे उद्देश हे जुने असून, आज परिस्थितीनुसार नवीन उद्देशांचा समावेश करणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रस्तुत संस्थेला नवीन योजना लागू करून संस्थेचे कामकाज सुरळीत करणे संस्थेच्या हिताचे आहे. करिता संस्थेचे कामकाज योग्य व वैध रितीने चालविण्यासाठी सोबत दिलेल्या प्रस्तावित योजनेस मंजुरी प्रदान करणे गरजेचे आहे.

३. अर्जदारानी अर्जामध्ये केलेले कथन, तोंडी युक्तीवाद या सर्व बाबी लक्षात घेतल्यानंतर आणि संस्थेची प्रस्तावीत घटना व नियम बारकाईने अवलोकन केल्यानंतर मी अश्या निर्णयास आली आहे की, संस्थेस नविन योजना लागू झाल्यास न्यासाचे पुढील कामकाज नियमानुसार व वैध रितीने चालविणे सोईचे होईल.

CHARITY ORGANISATION
Assistant Charity

४. सदर प्रकरणात जोडण्यात आलेले कागदपत्राची पहाणी केली असता असे निदर्शनास येते की, ज्या सदस्यांचा मृत्यू झाला आहे त्यांच्या रिक्त जागा त्या-त्या वेळी भरण्यात आलेल्या नाहीत. अश्या परिस्थितीत संस्थेचे कार्य चालविणे कठीण झालेले आहे. तसेच संस्थेकडे परीपूर्ण घटना नसल्यामुळे संस्थेचे कामकाज चालविण्या करिता, सदर संस्थेस घटना प्रदान करणे आवश्यक आहे.

५. अर्जदाराने सदर संस्थेच्या घटने सोबत ज्या व्यक्तिंचे संमती पत्र दाखल केलेले आहेत त्यांनी संस्थेच्या उत्थानासाठी कार्य करण्याची तयारी दाखविलेली आहे. त्याचप्रमाणे सदर योजने वर ज्या व्यक्तिंचा आक्षेप असेल त्यांनी तो आक्षेप दाखल करण्याकरिता महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनीयमचे कलम ७(अ) प्रमाणे वर्तमानपत्रामध्ये जाहिर नोटीस करण्यात आली. सदर नोटीसमध्ये आक्षेप घेण्याकरिता नमुद केलेल्या कालावधीत प्रस्तुतच्या अर्जावर कोणताही आक्षेप नोंदविलेला नाही. अश्या परिस्थीतीत ज्या व्यक्तिंची नावे योजनेमध्ये प्रथम कार्यकारी मंडळात नमुद केलेली आहे त्यांना कोणाचाही आक्षेप नाही असे स्पष्ट होते. अश्या परिस्थितीत योजना अर्जामध्ये नमुद करण्यात आलेल्या प्रथम विश्वस्त मंडळातील व्यक्ति या योजनेच्या अनुषंगाणे कार्य पाहण्यास पात्र ठरते.

६. सबब, वर नमुद केलेल्या प्रमाणे प्रथम विश्वस्त मंडळानेही योजना अंमलात आल्या पासुन तिन महिन्यांच्या कालावधीत सदर न्यासाची सर्वसाधरण सभा बोलवुन योजनेच्या नियम कं. ८ नुसार नविन विश्वस्त मंडळाची निवडणूक घेणे बंधनकारक राहिल. सबब, सदर संस्थेच्या उद्दीष्टांची पुर्ततेकरिता संस्थेस योजनेची आवश्यकता असल्याने खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

## :: आदेश ::

१. अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

Commissioner Chandrapur

CHARITY ORGANISATION

४ योजना अर्ज कमांक ०५/२०२२
महाराष्ट्र शिक्षण प्रसारक मंडळ, चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर
रजी.कं.ऐ-४७९३/चं.

२. अर्जासोबत सादर केलेली घटनाजोडपत्र अ सदर संस्थेस प्रदान करण्यात येत आहे.

३. संबंधीत बदलाची नोंद परिशिष्ट १ मध्ये घेण्यात यावी.

४. सदर आदेशापासुन तिन महिन्यांच्या कालावधीत सदर संस्थेस प्रदान केलेल्या घटनेनुसार अस्तित्वात आलेल्या कार्यकारी मंडळने पुढील ९० दिवसांमध्ये घटणेप्रमाणे नविन कार्यकारीणीची निवडणूक घेवून, निवडूण आलेल्या कार्यकारीचा बदल अर्ज मुदतीत सादर करावा.

५. न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत.

04-05-2022

(श्रीमती सि. एम. ढबाले)
सहायक धर्मादाय आयुक्त,
चंद्रपूर.

दिनांक : ०४/०५/२०२२.
चंद्रपूर

Assistant Charity Commission * Chandrapur *

Typed by
Read by
Compaired by

CHARITY ORGANISATION

CERTIFIED TO BE TRUE COPY

Superintendent
Public Trust Registration Office
Chandrapur Region, Chandrapur

The copy was applied for on... 08.05.22
Required fees for copies paid on... 10.05.22
The copy was Prepared on... 11.05.22
The copy was endorsed & ready to deliver on... 11.05.22

# जोडपत्र अ

(C-x4'9)

## योजना

Superintendent
Public Trust Registration Office
Chandrapur Region Chandrapur

१) संस्थेचे नाव "महाराष्ट्र शिक्षण प्रसारक मंडळ चंद्रपुर, जि चंद्रपुर"

२) **संस्थेचे नोंदणी क्रमांक** :- हा सार्वजनिक न्यास चंद्रपुर सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, चंद्रपुर येथे पंजीबद्ध असून त्याचा नोंदणी क्रमांक एफ - ४७९३ (चं.) असा आहे

Assistant Charity Commissioner Chandrapur

३) **संस्थेच्या कार्यालयाचा पत्ता** :- श्री. पांडुरंग सोमाजी आंबटकर
पठाणपुरा पोस्ट ऑफिस जवळ,
हिवरपुरी वार्ड नं ४८, चंद्रपुर

४) **संस्थेचे ध्येय व उद्देश** :-

१) ग्रामीण भागातील गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करणे. हुशार विद्यार्थ्यांना मदत पुढील शिक्षणासाठी मदत करणे. ग्रामीण भागात स्वच्छता, अंधविश्वास निवारण व रोजगार निर्मिती बाबत मार्गदर्शन व जनजागृती करणे.

२) गौशाला व गोरक्षण करणे तसेच समाजातील लोकांसाठी व्यसन मुक्ति केंद्र, वृद्धाश्रम, अनाथाश्रम ची स्थापना करून शासनाच्या परवानगीने चालविणे.

3) समाजाची शैक्षणिक, सामाजिक उन्नती व्हावी म्हणून समाजासाठी शैक्षणिक तथा समाज उपयोगी कार्याचे आयोजन करणे. उदा:- कॉन्वेंट, बालवाडी, अंगणवाडी, प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, आश्रम शाळा, उच्च माध्यमिक शाळा, वरिष्ठ महाविद्यालय स्थापन करून शासनाच्या परवाणगीने चालविणे.

४) आय टी आय महाविद्यालय, आयुर्वेदिक, होमीयोपॅथी, युनानी हॉस्पिटल, नर्सिंग महाविद्यालय, डी फॉर्म बी फॉर्म महाविद्यालय, पॉलीटेक्निक कॉलेज, इंजीनिअरिंग कॉलेज, मेडिकल कॉलेज, दंत वैद्यकीय महाविद्यालय, वस्तीगृह, अंध व मुकबधीर विद्यालय व महाविद्यालय, स्थापन करून शासनाच्या परवानगीने चालविणे.

Assistant Charity Commissioner Chandrapur

| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव |
|---|---|---|

५) बालकांसाठी शिससंगोपन केंद्र, पाळणाघर शासनाच्या परवानगीने चालविणे.

६) समाजातील लोकांसाठी वधू-वर परिचय मेळावे, विवाह मेळाव्यांचे आयोजन करणे. निशुल्क विवाह समारंभाचे आयोजन करणे.

७) समाज कल्याण, जिल्हा परिषद, नगरपालिका, सार्वजनिक बांधकाम विभाग, पंचायत समिती, ग्रामपंचायत, युवककल्याण, कृषि विभाग, महिला व बालविकास प्रकल्पाच्या कल्याणकारी योजना शासनाच्या परवानगीने राबविणे.

८) महिला प्रशिक्षण केंद्र, निराधार-निराश्रित महिला आधार गृह, वृद्धाश्रम, विधवाश्रम, कुमारीमाता यांच्या साठी आधार केंद्र स्थापन करून शासनाच्या परवानगीने चालविणे.

९) खेळाडूंना प्रोत्साहन मिळावे म्हणून खेळाडूंना राज्य, राष्ट्रीय पातळीवर निवड व्हावी म्हणून विशेष प्रयत्न करणे. त्यासाठी शिबिरे, प्रशिक्षण केंद्रे व मार्गदर्शन करणे.

१०) पर्यावरणाविषयी लोकांमध्ये जनजागृती निर्माण करण्यासाठी कार्य करणे. पर्यावरण बचाव अंतर्गत वृक्षारोपण सारख्या योजना संस्थेच्या कार्यक्षेत्रात शासनाच्या परवानगीने राबविणे.

११) अंध-अपंग, मूक-बधीर व्यक्तींना आरोग्य विषयक माहिती पुरविणे. त्यांना योग्य व चांगल्या प्रकारचे आरोग्य विषयक माहिती उपलब्ध करून देण्यासाठी आरोग्य मेळावे, आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करणे.

१२) युवा व युवतींना स्वयंपूर्ण करण्यासाठी व त्यांना स्वताचे पायावर उभे राहता यावे म्हणून लघु उद्योग कुटीर उद्योग, मुद्रणकला, हस्तकला, विनकाम, शिवणकाम, टंकलेखन, पेंटिंग यांचे प्रशिक्षण वर्ग चालविणे.

१३) राष्ट्रीय एकात्मता मजबूत करण्यासाठी राष्ट्रीय सण, जयंती, उत्सव साजरे करणे. तसेच मॅरथॉन स्पर्धा आयोजित करणे. रक्तदान, लसीकरण, वृक्षारोपण, कुटुंब नियोजन, पर्यावरण, अंधश्रद्धा निर्मूलन, साक्षरता प्रचार व आपदग्रस्त लोकांना मदत करणे.

१४) भारतीय संस्कृतिचे जतन करण्याचे दृष्टीने भारतीय कलांचे आयोजन करणे

अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव

५) **कार्यक्षेत्र** :- या संस्थेचे कार्यक्षेत्र संपूर्ण महाराष्ट्र असे राहील.

६) **सभासदत्व व त्याची नोंदणीची पद्धत :-**

अ) संस्थेचे कार्यक्षेत्रात राहणारी कोणतीही भारतीय व्यक्ती, ज्याचे / जिचे वय १८ वर्षांमध्ये कमी नाही व ज्यांना संस्थेचे उद्देश व नियमावली मान्य आहे. अशा व्यक्ती यासंस्थेचा/संस्थेची सभासद होण्यास पात्र राहील.

ब) सभासदत्वासाठी अशा व्यक्तीने संस्थेच्या सचिव/अध्यक्ष कडे लेखी अर्ज देणे आवश्यक राहील.

क) सभासदत्वासाठी प्राप्त झालेले अर्ज कार्यकारी मंडळाच्या बैठकीमध्ये निर्णयासाठी ठेवण्यात येतील. सभासद होऊ इच्छिणाऱ्या व्यक्तींना सभासद करून घ्यावे किवा घेऊ नये याबाबत चा निर्णय कार्यकारी मंडळाच्या बैठकीमध्ये कार्यकारी मंडळाच्या एकूण ३/५ बहुमताने घेण्यात येईल व अशा व्यक्तीने या नियमावलीत निर्धारित करण्यात आलेली सभासद फी संस्थेच्या कोशाध्यक्षाकडे सूचना प्राप्त झाल्याचे तारखेपासून १५ दिवसाचे आत जमा करणे अनिवार्य राहील.

ड) वरील नियम २ प्रमाणे फी मिळाल्यानंतर संबंधित व्यक्तीच्या नावाची नोंद सभासद नोंदणी वही मध्ये घेण्यात येईल. संस्था नोंदणी अधिनियम १८६० चे कलम १५ व सस्था नोंदणी (महाराष्ट्र) नियम १९७० मधील नियम १५ अनुसार सभासद नोंदणी वहीत अनुसूची एकच्या विहित नमुन्यात ठेवण्यात येईल.

७) **प्रथम कार्यकारी मंडळ :-**

| अ.क्र | नाव | पत्ता | वय | व्यवसाय | पद |
|---|---|---|---|---|---|
| १. | श्री. पांडुरंग सोमाजी आंबटकर | पठाणपुरा वार्ड नं १, ता. जि. चंद्रपुर | ६१ | धंदा | अध्यक्ष |
| २. | श्री. पीयूष पांडुरंग आंबटकर | पठाणपुरा वार्ड नं १, ता. जि. चंद्रपुर | ३० | नौकरी | उपाध्यक्ष |
| ३. | सौ. प्रीती पांडुरंग आंबटकर | पठाणपुरा वार्ड नं १, ता. जि. चंद्रपुर | ५४ | गृहिणी | सचिव |
| ४. | कु. अंकिता किशोर ढोबळे | आभा बिल्डिंग, लकडगंज, नागपुर | २९ | शिक्षण | सहसचिव |
| ५. | सौ. वंदना विनोद वरघने | मनीष नगर, विवेकानंद नगर, नागपुर | ५३ | गृहिणी | कोषाध्यक्ष |
| ६. | सौ. सुरेखा विजय हिवसे | हनुमान वार्ड, हिंगनघाट, जी. वर्धा | ५५ | गृहिणी | सदस्य |
| ७. | सौ. प्रांजली अमोल रघाताटे | जटपुरा, गेट, चंद्रपुर ता. जि. चंद्रपुर | ३५ | गृहिणी | सदस्य |

अध्यक्ष उपाध्यक्ष सचिव

७) **<u>सभासदाचे प्रकार :-</u>** संस्थेचे सभासद हे दोन प्रकारचे असतील. ते पुढीलप्रमाणे.

अ) **आजीव सभासद :-**

आजीव सभासदाची सभासद फी रुपये १००१/- राहील व त्याचे सभासदत्व आजीवन राहील.

आ) **साधारण सभासद :-**

साधारण सभासद फी वार्षिक रुपये १०१/- राहील व त्याचे सभासदत्व एका वर्षासाठी राहील.

८) **<u>सभासदत्व रद्द होणे</u> :**

संस्थेच्या सभासदाचे सभासदत्व खालील कारणास्तव रद्द होईल.

अ) सभासद संस्थेच्या कार्यक्षेत्रा बाहेर राहण्यास गेल्यास,

आ) वार्षिक सभासद फी तीन महिन्यापेक्षा जास्त कालावधीसाठी थकीत ठेवल्यास,

इ) नैतिक अधःपतनाचा अंतर्भाव असलेल्या अपराधाबद्दल दोषी ठरला असेल तर,

ई) स्वेच्छेने राजीनामा दिल्यास,

९) **<u>सर्वसाधारण सभा तिचे अधिकार व कार्य</u> :-**

अ) वरील नियम ३ व ४ प्रमाणे नोंदणी झालेल्या सर्व सभासदांची मिळून सर्वसाधारण सभा बनेल. सर्वसाधारण सभेच्या बैठकीत सर्व सभासद भाग घेऊ शकतात. ज्या सभासदाकडे सभासद फी तीन महिन्यापेक्षा जास्त कालावधीसाठी थकीत आहे असा सभासद बैठकीत भाग घेऊ शकणार नाही. मात्र त्याने बैठकीपूर्वी थकीत सभासद फी रीतसर जमा केल्यास तो बैठकीत भाग घेऊ शकेल.

ब) **सर्वसाधारण सभेचे अधिकार व कार्य खालील प्रमाणे राहतील :-**

१. कार्यकारी मंडळाने सादर केलेल्या वार्षिक अहवालास हिशोब पत्रकास व वार्षिक अंदाज पत्रकास मंजुरी देणे.

२. संस्थेच्या नियम नियमावलीमध्ये सुधारणा, बदल करणे, कार्यकारी मंडळाची निवड करणे.

३. संस्थेच्या लेखी परीक्षणासाठी सनदी लेखापाल किंवा अधिकृत लेखापरीक्षकाची नियुक्ती करणे.

४. संस्थेच्या कार्याबद्दल किंवा कार्यक्रमाबद्दल कार्यकारी मंडळास मार्गदर्शक सूचना देणे.

५. सभासदत्व नाकारण्यात आलेल्या व्यक्तीने अर्ज केल्यास त्यावर विचार करून निर्णय घेणे.

अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव

९. सर्वसाधारण सभेने घेतलेले निर्णय कार्यकारी मंडळावर व संस्थेच्या सर्व सभासदावर बंधनकारक राहतील.

१०) **सर्वसाधारण सभेची सूचना व गणसंख्या** :-

अ) सर्वसाधारण सभेची वार्षिक बैठक प्रत्येक वर्षी मार्च/ एप्रिल महिन्यात घेण्यात येईल. सर्वसाधारण सभेच्या. बैठकीची सूचना बैठकीच्या कमीतकमी १० दिवसापूर्वी प्रत्येक सभासदास त्यांचे पत्यावर देण्यात येईल किंवा पोस्टाने पाठविण्यात येईल.

ब) सर्वसाधारण सभेच्या बैठकीमध्ये एकूण सभासदाच्या २/३ सभासदांची उपस्थिती गनपूर्तीसाठी आवश्यक राहील. बैठकीच्या निर्धारित वेळेपासून अर्ध्यातासाचे आत गणपूर्तीसाठी आवश्यक असलेली सभासद संख्या एकत्र न आल्यास बैठक गणपूर्ततेअभावी तहकूब करण्यात येईल. तहकूब झालेल्या बैठकीस गणपूर्तीचे बंधन राहणार नाही.बैठक त्याचदिवशी त्याचठिकाणी अर्ध्या तासानंतर घेण्यात येईल. त्या बैठकीस कोरमचे बंधन राहणार नाही.

११) **विशेष साधारण सभा तिचे कार्य** :-

वार्षिक सर्वसाधारण सभेशीवाय विशेष सर्वसाधारण सभा केव्हाही घेता येईल. विशेष साधारणसभेत संस्थेच्या नियम आणि नियमावलीत करावयाच्या सुधारणा, कार्यकारी मंडळाची निवडणूक व इतर तातडीची कामे विचारात घेण्यात येईल. विशेष साधारण सभेची सूचना व गणपूर्ती नियम क्र. ९ (अ) व ९ (ब) प्रमाणे राहतील.

१२) **संस्थेचे कार्यकारी मंडळ, पदाधिकारीयांची रचना** :-

संस्थेचे कार्यकारी मंडळ एकूण ०७ सदस्यीय राहील. ज्यामध्ये खालील पदाधिकाऱ्यांचा समावेश राहील :-

| | | |
|---|---|---|
| अ) अध्यक्ष - ०१, | ब) उपाध्यक्ष - ०१, | क) सचिव - ०१, |
| ड) सहसचिव - ०१ | इ) कोषाध्यक्ष - ०१, | ई) सदस्य - ०२ |

१३) **कार्यकारी मंडळाचा कार्यकाळ व निवडणुकीची पद्धत** :-

अ) कार्यकारी मंडळाची निवडणूक प्रत्येक पाच वर्षांनी सर्वसाधारण सभेत सूचक व अनुमोदक घेण्यात येईल.

ब) कार्यकारी मंडळावर निवडून आलेले सभासदांमधून अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, सहसचिव, कोषाध्यक्ष व सदस्य यांची निवड करण्यात येईल.

अध्यक्ष उपाध्यक्ष सचिव

क) कार्यकारी मंडळाचा कार्यकाळ पाच वर्षाचा राहील.मात्र नवीन कार्यकारीमंडळ निवडून येईपर्यंत कार्यकारी मंडळ कार्यरतराहील. कार्यकारीमंडळाची निवडणूक सूचक-अनुमोदक पद्धतीने पद्धतीने घेण्यात येईल.

**१४) <u>कार्यकारी मंडळाचे पदाधिकारी व त्यांची कामे</u> :-**

**अ) अध्यक्ष :-**

१) कार्यकारी मंडळाच्या बैठकीचे व सर्वसाधारण सभेचे अध्यक्ष म्हणून काम पाहणे.

२) सर्वप्रकारच्या बैठकी बोलावणेबाबत संस्थेच्या सचिवास निर्देश देणे. निर्देशानुसार सचिवाने बैठक न बोलावल्यास स्वतः बैठक बोलाविणे.

3) मतदानात समान मते पडल्यास निर्णायक मत देणे.

४) संस्थेच्या नियमावलीनुसार तसेच मंजूर झालेल्या ठरावानुसार कार्यकरणे व त्याची दक्षता घेणे व कामकाजा बाबत निर्देश देणे किंवा कार्यवाही करणे.

५) कार्यवाही मंडळाच्या ठरावानुसार कर्मचाऱ्यांचे नियुक्ती, निलंबन व सेवामुक्तीच्या आदेशावर सहया करणे.

६) खर्चाची देयके मंजूर करणे, संस्थेच्या वतीने न्यायालयीन प्रकरणे किंवा कार्यालयीन पत्र व्यवहार सांभाळणे.

**ब) उपाध्यक्ष :-**

अध्यक्षाच्या अनुपस्थितीत त्याचे सर्व कार्य पार पाडणे. तसेच संस्थेच्या हिताच्या दृष्टीने आवश्यक ती कामे पार पाडणे.

**क) सचिव :-**

१. अध्यक्षांनी दिलेल्या निर्देशानुसार बैठक बोलावणे. सर्व बैठकीच्या कार्यवाहीची नोंद ठराव पुस्तकात घेणे व त्यावर अध्यक्षाच्या सहया घेणे.

२. संस्थेचा पत्रव्यवहार करणे,संस्थेच्या आर्थिक व्यवहाराबाबतचे हिशोब नियमित ठेवण्यासाठी अध्यक्षाला आवश्यक ती माहिती देणे. हिशोब नियमित व योग्य प्रकारे ठेवण्यात आल्याची खात्री करणे.

३. सभासद नोंदणी वही व इतर नोंदवहया अद्यावत ठेवणे.

४. संस्थेच्या कामावर देखरेख ठेवणे, तसेच मालमत्तेची निगा राखणे, संस्थेच्या दैनंदिन कामाच्या दृष्टीने आवश्यक ती सर्व कामे करणे.

५. संस्थेच्या कार्याबाबत चा वार्षिक अहवाल,हिशोब पत्रके व अंदाज पत्रके तयार करून ती सर्वसाधारण सभेपुढे मांडणे.

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव |

ड) **सहसचिव :-**

सचिवांच्या अनुपस्थितीत सचिवांची कामे पाहणे. सचिवांना आवश्यक त्या कामी, ठिकाणी मदत करणे. संस्थेच्या हितार्थ कार्य करणे.

इ) **कोषाध्यक्ष :-**

संस्थेच्या जमाखर्चाचे तपशील पाहणे. संस्थेचे ऑडीट सचिवाच्या मदतीने तयार करणे.

ई) **कार्यकारी मंडळाचे सभासद :-**

कार्यकारी मंडळाच्या सभेत व सर्वसाधारण सभेत उपस्थित राहणे, निवडणुकीच्या वेळी मतदान करणे व संस्थेच्या कामात आवश्यक ती मदत करणे.

१५) **<u>कार्यकारी मंडळाची सभा व मागणीची सभा</u> :-**

अ) संस्थेच्या कार्यकारी मंडळाची सभा तीन महिन्यातून एकदा घेणे आवश्यक राहील. संस्थेच्या कामाच्या दृष्टीने आवश्यक असेल त्यावेळी सुद्धा कार्यकारी मंडळाची सभा घेण्यात येईल.

कार्यकारी मंडळाच्या कमीतकमी ५ सभासदांनी कार्यकारी मंडळाची सभा बोलाविण्याबाबत अध्यक्षाकडे लेखी मागणी केल्यास अध्यक्षांनी कार्यकारी मंडळाची सभा १५ दिवसाचे आत बोलावली पाहिजे. अध्यक्षांनी सभा न बोलावल्यास मागणी करणाऱ्या सभासदापैकी कोणत्याही सभासदाच्या सहीने अशी सभा बोलावू शकेल व उपस्थित सभासदातून एकास सभाध्यक्ष म्हणून निवड करून काम सुरु करू शकेल व त्या सभेत झालेले निर्णय सर्वांना बंधनकारक राहतील.

१६) **<u>कार्यकारी मंडळाच्या सभेची सूचना व गणसंख्या</u> :-**

कार्यकारी मंडळाच्या सभेची सूचना कमीत कमी सात दिवस अगोदर कार्यकारी मंडळाच्या सर्व सभासदांना मिळाली पाहिजे. संस्थेच्या कार्यकारी मंडळाच्या सभेची सूचना नोटीस पुस्तकातून सर्व सभासदांना देण्यात येईल व संबंधितांची त्यावर सही घेण्यात येईल.नोटीस मध्ये तारीख, वेळ, स्थळ व सभेपुढील विषय स्पष्ट पणे नमूद करण्यात येईल. कार्यकारी मंडळाच्या बैठकीत कार्यकारी मंडळाच्या एकूण सभासदांच्या २/३ सभासदांची उपस्थिती गणपूर्तीसाठी आवश्यक राहील. गणपूर्ती न झाल्यास ती बैठक स्थगित करून दुसऱ्या तारखेस बोलाविण्यात येईल व या बैठकीत गणपुर्तीची आवश्यकता राहणार नाही.

अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव

१७) **<u>कार्यकारी मंडळाच्या निवडणुकीची पद्धत</u>** :-

कार्यकारी मंडळाची निवडणूक दर पाच वर्षांनी सर्व साधारण सभेत सूचक व अनुमोदक किंवा गुप्त मतदान पद्धतिने घेण्यात येईल.आवश्यकता असल्यास या सर्वसाधारण सभेत निवडणूक अधिकाऱ्याची नियुक्ती प्रथम करण्यात येईल. निवडणूक अधिकाऱ्याची नियुक्ती झाल्यानंतर सदर निवडणूक अधिकारी नामांकन पत्र स्वीकारणे त्याची छाननी करणे, निवडणुकीस पात्र असलेल्या सभासदाची नावे जाहीर करणे, हि सर्व कामे पूर्ण करील. आवश्यकता असल्यास मतदान घेण्यात येईल व निवडणूक अधिकारी निवडून आलेल्या सभासदांची नावे जाहीर करील.

१८) **<u>कार्यकारी मंडळातील रिक्त पद भरण्याबाबत</u>** :-

कार्यकारी मंडळातील सभासदाच्या/ पदाधिकाऱ्याच्या मृत्यू मुळे किंवा त्यांनी राजीनामा दिल्यामुळे किंवा नियम ८ मध्ये नमूद केलेल्या कारणास्तव सभासदत्व रद्द झाल्यास कार्यकारी मंडळात रिक्त होणारी जागा कार्यकारी मंडळाच्या उर्वरित सभासदांच्या बहुमताने भरण्यात येईल व याप्रकारे निवड करण्यात आलेल्या सभासदांचा कार्यकाल त्या कार्यकारी मंडळाच्या कालावधी पुरता मर्यादित राहील.

१९) **<u>कार्यकारी मंडळाचे अधिकार व कर्तव्ये</u>** :-

१. सर्वसाधारण सभेच्या ठरावाची अंमलबजावणी करणे, संस्थेच्या अंतर्गत चालणाऱ्या शाखेवर व कार्यावर नियंत्रण ठेवणे.

२. संस्था व संस्थेव्दारा संचालित शाखांमध्ये कर्मचाऱ्यांची नेमणूक करणे. त्यांच्यावर नियंत्रण ठेवणे, कर्मचाऱ्यांची बदली करणे, बढती करणे, कामावरून कमी करणे, संस्थेच्या उद्देशानुसार व नियमावली नुसार कार्य चालविणे, तसेच दैनंदिन कामाबाबत नियम तयार करणे.

३. वेगवेगळ्या खात्यातर्फे विहित करण्यात आलेली माहिती त्या त्या खात्यास नियमित सादर करणे, आवश्यक नोंद वह्या अद्यावत ठेवणे, संस्थेच्या आर्थिक व्यवहाराचे हिशोब ठेवणे व ते सक्षम लेखा परीक्षकांकडून तपासून घेणे व सर्वसाधारण सभेत मंजुरीस ठेवणे.

२०) **<u>हिशोबाचे वर्ष</u>** :-

हिशोबाचे वर्ष १ एप्रिल ते ३१ मार्च असे राहील.

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव |

२१) **संस्थेचा निधी, मिळकत व विनियोग:-**

संस्थेच्या सभासदाकडून मिळणारी सभासद फी संस्थेच्या दान अगर देणगी दाखल मिळणारी रक्कम शासनाकडून मिळणारे अनुदान हा संस्थेचा निधी राहील.

२२) **उद्दिष्ट निहाय खर्चाची तरतूद :-**

संस्थेला मिळणारी रक्कम हि संस्थेच्या उद्देशावर खर्च करण्यात येईल. ती पुढील प्रमाणे महिला विकास व बालकल्याण - ३०%, शैक्षणिक- ५०%, सामाजिक, सांस्कृतिक व क्रीडा- २०%.

२३) **कर्ज किवा ठेवी संबंधी तरतूद :-**

संस्थेच्या कामासाठी संस्थेला अतिरिक्त रक्कमची आवश्यकता भासल्यास कार्यकारी मंडळातील कोणत्याही पदाधिकारी, व्यक्तीकडून कर्ज किवा ठेव स्वीकारता येईल. परंतु तसा ठराव कार्यकारी मंडळाच्या बहुमताने ठराव मंजूर करून मा. धर्मदाय सह आयुक्त, नागपूर यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक राहील.

२४) **बँक खाते :-**

संस्थेचे व्यवहार, संस्थेजवळ शिल्लक असलेली रक्कम कोणत्याही राष्ट्रीयीकृत बँकेत संस्थेच्या नावाने ठेवण्यात येईल. या खात्यावरचा व्यवहार अध्यक्ष, सचिव किवा कोषाध्यक्ष यापैकी कोणत्याही दोन पदाधिकाऱ्याच्या संयुक्त सहीने व्यवहार पूर्ण करण्यात येईल.

२५) **स्थावर मालमत्ता खरेदी विक्री करणे बाबत तरतूद :-**

संस्थेला मालमत्ता खरेदी विक्री करण्याचे अधिकार राहील.संस्थेला त्याकरिता कार्यकारी मडळाचे बहुमताने तसा ठराव पारित करून संमती घ्यावी लागेल. तसेच संस्थेला मालमत्ता विक्री करावयाची असल्यास मा. धर्मदाय सह आयुक्त, नागपूर यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक राहील.

२६) **सभासदांची यादी ठेवण्याची पद्धत :-**

संस्था नोंदणी अधिनियम १८६० चे कलम १५ व संस्था नोंदणी (महाराष्ट्र) नियम १९७१ मधील नियम १५ प्रमाणे संस्थेच्या सभासदाची नोंदवही अनुसूची सह वा विहीत नमुन्यात ठेवण्यात येईल.

अध्यक्ष उपाध्यक्ष सचिव

२७) **नियम आणि नियमावलीत बदल करण्याची तरतुद :-**

संस्थेच्या नियम आणि नियमावलीत बदल सर्वसाधारण सभेच्या बैठकीत एकूण सभासदाच्या ३/५ बहुमताने ठराव मंजूर करून घेण्यात येईल १८६० चे संस्था नोंदणी अधिनियमचे कलम १२ प्रमाणे हि कार्यवाही पूर्ण करण्यात येईल.

२८) **संस्थेचे विसर्जन :-**

संस्था नोंदणी अधिनियम १८६० चे कलम १३ व १४ मधील तरतुदीला अनुसरून संस्थेचे विसर्जन ३/५ सभासदांच्या बहुमताने करता येईल. संस्थेची सर्व प्रकारची देणी व शिल्लक संस्थेचे बाकी व्यवहार पूर्ण करून राहणारी संपत्ती संस्थेचे ३/५ सभासद ठरविल त्या प्रमाणे ती दुसऱ्या संस्थेस देण्यात येईल.

## -: दाखला :-

प्रमाणित करण्यात येते कि, **"महाराष्ट्र शिक्षण प्रसारक मंडळ चंद्रपुर, ता. जि. चंद्रपुर"** या संस्थेच्या नियम व नियमावलीची मूळ प्रत आहे.

| अ.क्र | सभासदांचे नाव | पद | स्वाक्षरी |
|---|---|---|---|
| १. | श्री. पांडुरंग सोमाजी आंबटकर | अध्यक्ष | |
| २. | श्री. पीयूष पांडुरंग आंबटकर | उपाध्यक्ष | |
| ३. | सौ. प्रीती पांडुरंग आंबटकर | सचिव | Sau. P. Ambadkar |

दिनांक :- २८ / ०१ / २०२२

ठिकाण :- चंद्रपूर

Assistant Charity Commissioner, Chandrapur

Typed by Read by Compared by

04-05-2022

सहायक धर्मादाय आयुक्त, चंद्रपूर विभाग, चंद्रपूर

CERTIFIED TO BE TRUE COPY

अध्यक्ष उपाध्यक्ष सचिव

Superintendent Public Trust Registration Office Chandrapur